# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

## भाषा भाग - २

### इयत्ता १ ली ते ८ वी

### विषय : मराठी (द्‌वितीय भाषा)

# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

## भाषा भाग - २

## इयत्ता १ ली ते ८ वी

## विषय : मराठी (द्‌वितीय भाषा)

### अनुक्रमणिका

**क्र.** **पृष्ठ क्र.**

१. प्रास्ताविक ........ ४

२. काही मार्गदर्शक तत्त्वे आणि आनुषंगिक निर्णय ........ ४

३. मराठी (द्‌वितीय) भाषाशिक्षणाची सर्वसाधारण उद्‌दिष्टे ........ ५

४. पाठ्यक्रमांची चार टप्प्यांत विभागणी ........ ६

४.१ पहिला टप्पा – इयत्ता १ ली व २ री

४.२ दुसरा टप्पा – इयत्ता ३ री व ४ थी

४.३ तिसरा टप्पा – इयत्ता ५ वी व ६ वी

४.४ चौथा टप्पा – इयत्ता ७ वी व ८ वी

५. अध्ययनाची क्षेत्रे ........ ८

५.१ पहिले क्षेत्र – घर आणि परिसरात चालणाऱ्या भाषिक आंतरक्रिया

५.२ दुसरे क्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथे होणाऱ्या भाषिक आंतरक्रिया

५.३ तिसरे क्षेत्र –भाषेच्या नियमव्यवस्थेचा परिचय

५.४ चौथे क्षेत्र – साहित्याचा आस्वाद

५.५ पाचवे क्षेत्र – स्वप्रकटीकरणाचे प्रयत्न

६. पाठ्यक्रमाची मांडणी ........ १०

६.१ संबोध

६.२ अध्ययन अनुभव

६.३ विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदल
६.४ मूल्यमापन पद्धती – तंत्रे व साधने
७. इयत्तांनुसार उद्दिष्टे व पाठ्यक्रम ........ १४
७.१ इयत्ता १ ली ........ १५
७.२ इयत्ता २ री ........ २६
७.३ इयत्ता ३ री ........ ३४
७.४ इयत्ता ४ थी ........ ४५
७.५ इयत्ता ५ वी ........ ५२
७.६ इयत्ता ६ वी ........ ६३
७.७ इयत्ता ७ वी ........ ७१
७.८ इयत्ता ८ वी ........ ७७
परिशिष्ट अ– उद्दिष्टांचा तुलनात्मक तक्ता ........ ८७
परिशिष्ट 'ब' दृष्टिक्षेपात संबोधांची मांडणी ........ ९४

# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२

## इयत्ता - १ ली ते ८ वी

## विषय - मराठी (द्‌वितीय भाषा)

### १. प्रास्ताविक :

महाराष्ट्र राज्य पश्चिमेला समुद्राने तर उरलेल्या तीन दिशांना पाच राज्यांनी वेढलेले आहे. या राज्यांच्या सीमांवरून, तसेच अन्य राज्यांतून, एवढेच काय पण जागतिकीकरणाचा आणि उदारीकरणाचा परिणाम म्हणून अन्य देशांतूनही नोकरी व धंदा–व्यवसायासाठी अनेक कुटुंबे काही काळाकरिता का होईना येथे स्थायिक झाली आहेत. घटनात्मक तरतुदीप्रमाणे भाषिक अल्पसंख्याकांना आपल्या भाषेचे माध्यम असलेल्या शाळा काढण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे कन्नड, तेलगू, हिंदी, गुजराती, उर्दू, सिंधी आणि इंग्लिश माध्यमांच्या ७००च्या वर शाळा महाराष्ट्रात सध्या चालू आहेत.

महाराष्ट्र शासनाने ४ फेब्रुवारी २००९ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार या शाळांतून मराठी हा विषय अनिवार्य केलेला आहे. या मुलांचे त्यांच्या भोवतीच्या समाजात चांगले समायोजन व्हावे, आपल्या गरजा, भावना, विचार, कल्पना आपल्या मित्रांपर्यंत, त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत, तसेच शेजाऱ्यांपर्यंत पोहोचवता याव्या, त्यांच्या भावना, कल्पना, विचार या मुलांना कळाव्यात, इथल्या सणा–समारंभात त्यांना मोकळेपणाने भाग घेता यावा, इथल्या संस्कृतीचा त्यांना परिचय व्हावा आणि या साऱ्यांमुळे सर्व राज्यांतील विविध भाषकांमध्ये सामंजस्य निर्माण व्हावे, या हेतूने प्राथमिक शाळांचा मराठी (द्‌वितीय) भाषेचा अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी अभ्यासक्रम समितीवर आणि तो अंमलात आणण्याची जबाबदारी शिक्षक–शिक्षिकांवर पडली आहे. मराठी अभ्यासक्रम समितीने त्या दृष्टीने केलेला प्रयत्न आपल्यापुढे मांडला आहे.

### २. काही मार्गदर्शक तत्त्वे आणि अनुषंगिक निर्णय

(१) मुलांना द्‌वितीय भाषा जितक्या लहान वयात शिकायची संधी मिळेल तितक्या प्रमाणात ती सहजपणे आणि तद्‌देशीय भाषकांप्रमाणे त्यांना बोलता येते. मराठी द्‌वितीय भाषा म्हणून पहिलीत शिकण्याची संधी या मुलांना मिळाली आहे. त्यामुळे त्यांचे मराठी भाषेचे शिक्षण सहज आणि आनंददायी होणार आहे.

(२) द्‌वितीय भाषा शिकण्यासाठी मुलांचा कल (aptitude) आणि संप्रेरण (motivation) आवश्यक असते. कारण जेवढी अभिवृत्ती (attitude) सकारात्मक तेवढी यशाची खात्री अधिक; म्हणून पालक आणि शिक्षक यांनी मुलांमध्ये सकारात्मक अभिवृत्ती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

(३) शाळा आणि घर–परिसर या ठिकाणी एकच भाषा वापरात असेल तर दोन्ही ठिकाणची भाषिक देवाण–घेवाण आणि त्यात मुलांचा सहभाग भरपूर होण्याची शक्यता असते. ती अत्यावश्यक असते. द्‌वितीय भाषेच्या बाबतीत मात्र ही शक्यता कमी असल्याने भाषिक देवाण–घेवाणीची प्रक्रिया मुद्‌दाम जाणीवपूर्वक घडवून आणावी लागणार आहे.

(४) भाषा पहिली असो वा दुसरी, शिकणाऱ्याला तिचा आनंद घेत शिकायचे असेल तर 'भाषा शिकण्यापेक्षा (learning of language) 'भाषाग्रहणा'चा (acquisition of language) अवलंब करणेच योग्य ठरते. या अभ्यासक्रमाने देखील तोच दृष्टिकोन स्वीकारला आहे.

(५) अध्यायनानुभवांची निवड करताना खेळ, कृती, आकर्षक शैक्षणिक साधने याबरोबर वर्गमित्रांकडून अध्ययन (peer learning) यांचा समावेश त्यात आवश्यक ठरणार आहे. यासाठी 'भाषेच्या समावेशक अध्ययन पद्धतीचा'चा (eclectic method) अवलंब करावा लागणार आहे. तसेच ज्ञानसंरचनावादाच्या (constructivism) मार्गदर्शनानुसार 'शिकविण्या'पेक्षा (teaching) 'शिकण्या'वर (learning) भर द्यावा लागणार आहे.

(६) मुलांच्या अर्भकावस्थेत भाषाग्रहणाची सुरुवात श्रवणाने होते. पुरेसे श्रवण झाले की त्याला/तिला बोलण्याची इच्छा होते. प्रथम भाषेत हे इतके सहज होते की सामान्य माणसांच्या ते लक्षातही येत नाही. अमराठी मुलांना ती सुविधा नसल्याने शिक्षकांनी श्रवणाचे अनुभव भरपूर आणि जाणीवपूर्वक देणे गरजेचे ठरणार आहे. श्रवण–भाषण हा वाचन–लेखनाचा पाया असल्याने पहिली व दुसरीत त्यावर भर द्यावा लागणार आहे. वाचन–लेखनाची अप्रत्यक्ष तयारी हळूहळू सुरू करायची असली तरी वाचनाची सुरुवात तिसरीत करायची आहे आणि लेखनाची सुरुवात चौथीअखेरीला करायची आहे. औपचारिक वाचन–लेखनाला सुरुवात पाचवीत झाली व पुढे हळूहळू वाढत गेली तरी त्यांचे वय आणि त्यानुसार निर्माण होणाऱ्या आवडीनिवडी लक्षात घेऊन त्यांच्या वाचन–लेखन अनुभवांची निवड करावी लागणार आहे.

## ३. मराठी (द्वितीय) भाषाशिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे

विद्यार्थ्यांना पुढील सर्वसाधारण उद्दिष्टे साध्य करता यावीत, या हेतूने चेतक व पोषक वातावरण निर्माण करणे–

(१) मराठी भाषा समजून ऐकणे व बोलणे.

(२) शाळेत आणि समाजात वावरत असताना आपल्या गरजा, भावना, कल्पना आणि विचार योग्य प्रकारे व्यक्त करणे व इतरांच्या गरजा, कल्पना, भावना व विचार समजून घेणे.

(३) समाजात वावरताना येथील सण–समारंभात सामील होणे, आपल्या रीतिरिवाजांची, सणसमारंभाची माहिती देता येणे.

(४) समाजात वावरताना सार्वजनिक व्यवहारासंबंधी सूचना, नकाशे समजून वाचता येणे व त्याप्रमाणे प्रतिसाद देता येणे.

(५) आपल्या वयाला अनुरूप अशा कथा, कविता, विनोद, कोडी इत्यादी वाचून त्यांचा आनंद घेता येणे.

(६) वयानुसार आपले विचार, कल्पना, भावना लिखाणातून व्यक्त करता येणे.

## ४. पाठ्यक्रमांची चार टप्प्यांत विभागणी :-

सन २००९ साली आपल्या देशाने मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या हक्काचा कायदा केला. त्यातील तरतुदीनुसार प्राथमिक स्तरावर कोणत्याही विद्यार्थ्याला त्याच वर्गात मागे ठेवले जाणार नाही. त्यामुळे मुलांच्या मनावरील दडपण दूर होणार आहे. ही फारच चांगली गोष्ट घडली आहे. मात्र त्याच बरोबरीने आपल्याला हेही लक्षात ठेवायला पाहिजे की सर्व मुलांची अभ्यासातील प्रगती एकाच वेगाने होत नसते. त्यासाठी काहीजणांना थोडा अधिक वेळ मिळाला तर ते इतरांबरोबर येऊ शकतात. हे लक्षात घेऊनच द्वितीय भाषाशिक्षणासाठी प्राथमिक स्तराचे चार टप्पे केले आहेत.

### ४.१ पहिला टप्पा - इ. १ ली व २ री -

मराठी द्वितीय भाषा शिकणाऱ्यांना या भाषेचा पूर्वानुभव नसल्यामुळे, त्यांची सकारात्मक अभिवृत्ती तयार करण्याची मोठी जबाबदारी या टप्प्यात पार पाडावी लागणार आहे. यात घरी पालक आणि शाळेत शिक्षिका यांनाच मोठा वाटा उचलावा लागणार आहे. मराठी भाषक मुले शाळेत प्रवेश करतात तेव्हा त्यांच्या परिसरातील भाषेवर त्यांनी चांगलेच प्रभुत्व मिळविलेले असते. त्यांची भाषण शब्दसंपत्ती सुमारे २००० शब्दांपर्यंत पोहोचलेली असते. त्यामुळे त्यांना शाळेतील भाषिक वातावरणाशी जुळवून घेणे सोपे जाते आणि त्यांची शैक्षणिक प्रगती उत्तम प्रकारे होऊ शकते. ज्या मुलांची भाषण शब्दसंपत्ती यापेक्षा कमी असते त्यांना पूरक अध्ययन अनुभवांद्वारे विशेष मदत देऊन काही प्रमाणात तरी त्यांची भाषण शब्दसंपत्ती वाढविण्याचे प्रयत्न केले जातात.

अमराठी भाषक मुलांची मराठी भाषण शब्दसंपत्ती अत्यल्प असल्यामुळे पहिल्या वर्गात आणि घरी प्रयत्न केले तरच वर्षअखेरीला त्यांची सुमारे ५०० शब्दांपर्यंत श्रवण आणि १५० शब्दांपर्यंत भाषण शब्दसंपत्ती आणि २५ दृक्शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित होऊ शकेल. या पूर्वतयारीवर दुसरीत वर्षअखेरीला ६०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, २०० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि ५० दृक्शब्दांची वाचन शब्दसंपत्ती ते संपादित करू शकतील. त्यामुळे हे विद्यार्थी गाणी म्हणणे, गोष्टी सांगणे, अनुभवकथन करणे इत्यादी उपक्रमांत सहभागी होऊ शकतील. त्यांचे दृक्शब्दांचे (sight-vocabulary) वाचन सुरू होऊ शकेल आणि लेखन कौशल्यासाठी पूर्वतयारी सुरू करता येईल.

### ४.२ दुसरा टप्पा - इयत्ता ३ री व ४ थी

श्रवण-भाषण कौशल्यांचे दृढीकरण करण्यासाठी आणि वाचनात प्राथमिक प्रगती साधण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत पुरविणारा हा कालखंड ठरू शकेल. या कालखंडात मिळणाऱ्या अध्ययनानुभवांचा परिणाम म्हणून तिसरी अखेरीला त्यांची श्रवण शब्दसंपत्ती सुमारे ७०० शब्दांपर्यंत, भाषण शब्दसंपत्ती सुमारे २५० शब्दांपर्यंत आणि

७० शब्दांपर्यंत वाचन शब्दसंपत्ती पोहोचलेली असेल. तर चौथी अखेर त्यांची श्रवण शब्दसंपत्ती सुमारे ८०० शब्दांपर्यंत, भाषण शब्दसंपत्ती सुमारे ३०० शब्दांपर्यंत आणि ८० शब्दांपर्यंत वाचन शब्दसंपत्ती पोहोचलेली असेल. या प्रक्रियेच्या मध्यात त्यांचा दृक्शब्दसंपत्तीचा संग्रह वाढल्यामुळे आणि शब्दपृथक्करणाचे तंत्र समजल्यामुळे ते स्वतःहून मुळाक्षरे आणि स्वरचिन्हे शोधून काढू शकतील. परिचित अक्षरांपासून शब्द बनविणे, अपरिचित शब्दांत परिचित अक्षरे शोधणे, सर्व मुळाक्षरांचा परिचय झाल्यावर त्यांतून उच्चारसाम्यतेनुसार मुळाक्षरांची पारंपरिक रचना तयार करणे यासारख्या स्वयं–अध्ययनाच्या सरावातून वाचनात स्वतंत्रता प्राप्त करू शकतील, तर लेखनात अक्षरलेखनापर्यंत प्रगती साधली जाईल.

### ४.३ तिसरा टप्पा – इयत्ता ५ वी व ६ वी

मराठी भाषेत श्रवण, भाषण आणि वाचनात या विद्यार्थ्यांनी गाठलेले टप्पे आणि प्रथम भाषेत केलेली एकत्रित प्रगती पाहता या इयत्तांत औपचारिक व्याकरणाच्या परिचयाला सुरुवात करणे इष्ट ठरेल. वाचनात स्वतंत्रता मिळविलेल्या या विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यासाठी या टप्प्यात त्यांना आवडेल असे, पण त्यांच्या शब्दसंग्रहाच्या मर्यादेत लिहिले गेलेले वाचनसाहित्य उपलब्ध करून द्यावे लागेल. यासाठी इयत्ता पाचवीत सुमारे ९०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, ३५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि ९० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित व्हावी लागेल, तर सहावीत सुमारे १००० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, ४०० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि १०० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित व्हावी लागेल. या साहित्यातून मराठी लोकजीवनाचा परिचय व्हायला हवा. पण त्याबरोबरच त्यांच्या संस्कृतीशी असलेले नातेही त्यांना अनुभवायला मिळावे. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी भारतीय संस्कृतीच्या समान वारशाचे भान निर्माण होऊ शकेल. हे त्यांनी केलेल्या साहित्यातील नमुन्यांच्या सहज अभ्यासामुळे घडू शकेल. अनुलेखन, श्रुतलेखन, प्रश्नांच्या उत्तरांचे लेखन यामुळे लेखनसरावही होईल.

### ४.४ चौथा टप्पा – इयत्ता ७ वी व ८ वी

मुलांचे त्यांच्या माध्यमभाषेवरचे प्रभुत्व, मराठी भाषेशी त्यांचा सहा वर्षांचा झालेला परिचय आणि त्यांची विकासावस्था लक्षात घेता या इयत्तांत भाषेच्या नियमव्यवस्थेचा अधिक परिचय आणि साहित्यातील प्रकारांचा प्राथमिक परिचय करून देणे इष्ट ठरेल. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी आपले अनुभव वेगळ्या रितीने प्रकट करण्याची ऊर्मीही निर्माण होईल. यासाठी सातवीत सुमारे ११०० शब्दांची श्रवणशब्दसंपत्ती, ४५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि १२० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित व्हावी लागेल, तर आठवीत १२०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, ५०० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि १४० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित व्हावी लागेल.

## ५. अध्ययनाची क्षेत्रे :-

शिक्षक जेव्हा विद्यार्थ्यांच्या भाषाध्ययनाचा विचार करू लागतात तेव्हा त्यांना पहिली गरज निर्माण होते ती आशयाची. हा आशय त्यांना मुलांच्या घरातील संभाषणापासून ते साहित्यिकांच्या निर्मितीपर्यंत अनेक रूपांत भेटत असतो. घरातील संभाषणात तो अनौपचारिक भाषिक आंतरक्रियांच्या स्वरूपात आढळून येतो, तर उरलेल्या चार क्षेत्रांत तो औपचारिक आणि नियोजित आंतरक्रियांच्या स्वरूपात दिसून येतो. द्वितीय भाषा घरी वापरली जात नसल्यामुळे अनौपचारिक क्षेत्राचा म्हणजेच घर आणि परिसरात चालणाऱ्या भाषिक आंतरक्रियांचा तसेच भाषा म्हणून परिचय झालेला नसल्यामुळे औपचारिक क्षेत्रांपैकी साहित्याचा आस्वाद व स्वप्रकटीकरणाचे प्रयत्न या क्षेत्रांचा इयत्तानुरूप पाठ्यक्रमात प्रत्यक्ष समावेश केलेला नाही. परंतु त्या क्षेत्रांचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे.

### ५.१ पहिले क्षेत्र - घर आणि परिसरात चालणाऱ्या भाषिक आंतरक्रिया :-

सर्वसाधारण परिस्थितीत मुलांच्या घरी व परिसरात तेथल्या भाषेत चालणाऱ्या अनौपचारिक संभाषणातून, चर्चेतून त्यांची शाळेतील पूर्वतयारी सहजपणे होत असते, कारण घर आणि शाळा येथे एकाच भाषेत आंतरक्रिया चालतात. पण **आपल्या समोरचे बहुसंख्य विद्यार्थी अमराठी घरांतून येत असतात.** त्यामुळे घरी आणि परिसरात सहजपणे घडणाऱ्या आंतरक्रियांचा फायदा या मुलांना मिळत नाही. कारण अभ्यासावयाची भाषा घरात वापरल्या जाणाऱ्या भाषेपेक्षा वेगळी आहे. **म्हणून या अभ्यासक्रमात या क्षेत्रातले अध्ययन अनुभव गृहीत धरलेले नाहीत.**

**तरीही पालकांकडून त्यांच्या पातळीवर काही प्रयत्न होणे गरजेचे आहे.** अमराठी घरातील पालकांनी आपल्या मुलांना मराठी शिकण्यासाठी निरनिराळ्या प्रकारे प्रोत्साहन द्यावे. दूरचित्रवाणी, आकाशवाणी यावरील मुलांचे मराठी कार्यक्रम मुलांना दाखवायला, ऐकवावयाला हवेत. मराठी गाण्यांच्या, गोष्टींच्या सीडीज मिळतात त्यादेखील दाखवायला हव्यात. मुलांना शाळेतही याच तऱ्हेचे अनुभव मिळत राहिले तरच त्यांची मराठी भाषेची श्रवण आणि भाषण शब्दसंपत्ती वाढू शकेल आणि लहान प्रमाणात का होईना पण मुलांची भाषिक पूर्वतयारी होऊ शकेल.

शाळेत जे जे अनुभव मिळतात, त्यातून ज्या नव्या गोष्टी माहिती होतात अथवा करता येतात त्या घरच्या माणसांना सांगाव्यात, दाखवाव्यात, त्यांची शाबासकी मिळवावी असे या वयातील मुलांना वाटत असते म्हणून ते आपले अनुभव घरी सांगत असतात, त्या त्या कृतीही करून दाखवीत असतात. मोठ्यांनी अपेक्षित प्रतिसाद दिले तर मुलांचा हुरूप वाढतो.

याबाबत एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी. आजही शाळातून पालक-शिक्षक संघ अस्तित्वात असतात; पण त्यांचे स्वरूप बरेचसे औपचारिक असते. या अभ्यासक्रमात सुचविलेल्या आंतरक्रिया घडून यायला काही काळ जावा लागेल. पहिली गोष्ट म्हणजे या आंतरक्रियांचे महत्त्व शिक्षकांना स्वतःला समजून घ्यावे लागेल आणि नंतर पालकांना समजावून द्यावे लागेल.

## ५.२ दुसरे क्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथे होणाऱ्या भाषिक आंतरक्रिया :–

या क्षेत्रात मुलांनी शाळेत प्रवेश केल्यावर तिथल्या व्यक्तींशी होणाऱ्या आंतरक्रियांपासून ते शाळेबाहेरील समाजातील व्यक्तींशी होणाऱ्या आंतरक्रियांचा समावेश होतो. एवढेच नव्हे तर पुस्तकांतून मिळालेल्या अप्रत्यक्ष अनुभवांमुळेही मुलांची भाषा ग्रहणाची क्रिया चालूच राहत असल्याने तिचाही समावेश या क्षेत्रात केलेला आहे.

वरील ४.१ च्या मुद्द्यात म्हटल्याप्रमाणे घरून मराठी शिकण्यासाठीची पूर्वतयारी होण्याची शक्यता कमीच असल्याने शिक्षक/शिक्षिकांनाच श्रवण–भाषणाचे जास्तीत जास्त अनुभव द्यावे लागतील. **इयत्ता चौथीपर्यंत केवळ वर्ग, शाळा व समाज येथील भाषिक आंतरक्रियांचाच विचार केला जाणार आहे.**

इयत्ता पहिलीत बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या घरी बोलल्या जाणाऱ्या भाषांपेक्षा वेगळ्या अशा राज्यभाषेचे अध्ययन सुरू होईल. ते योग्य वातावरणात चालू राहण्यासाठी शिक्षकांना विद्यार्थ्यांशी जवळीकतेचे नाते जाणीवपूर्वक निर्माण करावे लागेल. त्याचा एक मार्ग म्हणजे जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा मुलांच्या घरी बोलल्या जाणाऱ्या भाषांबद्दलचा आदर जाणीवपूर्वक व्यक्त करावा लागेल. तो त्या त्या भाषांतील संबंधित शब्द विचारून, शक्य असेल तर त्यांतील साम्य दाखवून, त्यांचा संधी मिळेल तेव्हा उपयोग करून व्यक्त करता येईल. मात्र भावनिक जवळिकीच्या दृष्टीने हे जरूरीचे असले तरी शिक्षकांची मुख्य जबाबदारी मुलांना मराठी शिकविण्यास मदत करण्याची आहे, हे जाणून अध्ययन अनुभवांची निवड करावी लागणार आहे.

## ५.३ तिसरे क्षेत्र –भाषेच्या नियमव्यवस्थेचा परिचय

हे क्षेत्र भाषेच्या अंगभूत नियमव्यवस्थेसंबंधीचे आहे. मातृभाषेच्या संदर्भात असे आढळते की घरात आणि समाजात भाषा ग्रहणाची अनौपचारिक प्रक्रिया चालू असताना मुलांच्या अंतर्मनात भाषेच्या व्यवस्थेसंबंधीचे आकलन अबोधावस्थेत आकार घेत असते. भाषेचे समाजमान्य नियम तयार करण्याची आणि त्यांचा पडताळा पाहण्याची प्रक्रिया मुलांच्या मनात सुरू असते. तशीच प्रक्रिया नव्या भाषेच्या संदर्भात शाळेत आल्यानंतर सुरू होईल. मात्र त्या संबंधात शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी येणार आहे. भरपूर उदाहरणे अनुभवाला येऊ लागतात तेव्हाच त्यातील साम्यभेद लक्षात येऊन काही अंदाज बांधणे, त्यांचा पडताळा पाहणे व खात्री झाल्यावर त्यासंबंधी नियम तयार करणे अशी ही प्रक्रिया मुलांच्या मनात चालू राहते. नव्या भाषेच्या संदर्भात जी काही प्रक्रिया होणार ती बहुतांशी शाळेपुरती अथवा शाळेने आयोजित केलेल्या शाळेबाहेरील उपक्रमांपुरतीच मर्यादित राहणार आहे. त्यामुळे मुलांना नव्या भाषेचा जास्तीत जास्त अनुभव कसा देता येईल असा विचार करून तसे अनुभव द्यावे लागतील. या विषयाची निकड आणि शाळेत त्यासाठी मिळणारा मर्यादित वेळ लक्षात घेता शिक्षक/शिक्षिकांना मोठ्या प्रमाणात उपक्रमशीलता दाखवावी लागेल.

## ५.४ चौथे क्षेत्र – साहित्याचा आस्वाद

मातृभाषेच्या संदर्भात साहित्यिक रचनांचा समावेश पहिलीपासूनच्या वाचन साहित्यामध्ये झालेला असतो आणि त्या त्या पातळीनुसार विद्यार्थ्यांकडून त्याचा आस्वादही घेतला जात असतो. तो दुसरी ते चौथीपर्यंत

तसाच चालू असतो. पाचवीपासून साहित्यप्रकारांतील साम्यभेद जाणवू लागतात, त्याबद्दल चर्चाही सुरू होते, पण त्यांना औपचारिक शब्दरूप मिळते ते आठवीच्या स्तरावर. नव्या भाषेच्या संदर्भात साहित्यापेक्षा भाषाशिक्षणावर अधिक भर द्यावा लागणार असल्याने आठवीपर्यंत मराठी भाषेतील साहित्यामध्ये प्रकटीकरणाच्या असणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारांची अप्रत्यक्ष जाणीव निर्माण होणे एवढेच शक्य होईल.

### ५.५ पाचवे क्षेत्र – स्वअभिव्यक्तीचे प्रयत्न –

लहान बाळ दुसऱ्यांचे बोलणे दीड दोन वर्षे ऐकल्यावर ज्याप्रमाणे आपणहून बोलू लागते, त्याचप्रमाणे खूप चांगले वाचले की आपणही काहीतरी लिहावे असे विद्यार्थ्यांना वाटू लागते. या नैसर्गिक स्फूर्तीला प्रोत्साहन देण्याची व मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शिक्षकांची असते. त्याची सुरुवात विविध प्रकारच्या निबंधलेखनाने होत असते. त्यात एकसाचेपणा येणार नाही याची काळजी शिक्षकांनी घ्यायला हवी. कारण जसजसा साहित्य प्रकारांचा परिचय वाढू लागतो, त्यांची वैशिष्ट्ये समजू लागतात, तसतसा काही मुलांच्या मनात आपणही असेच काही तरी लिहावे या प्रेरणेचा उदय होऊ लागतो. तिला इष्ट ते वळण देण्याचे काम शिक्षकांना या स्तरावर करावयाचे असते. या विद्यार्थ्यांना मिळणारा मर्यादित वेळ लक्षात घेता या आंतरक्रियांबाबतही मर्यादित अपेक्षा ठेवणे इष्ट ठरेल.

## ६. पाठ्यक्रमाची मांडणी –

मुद्दा क्र. ४ मध्ये उल्लेखिलेल्या प्रत्येक टप्प्यातील पाठ्यक्रम त्याच्या विविध अंगांसह एका दृष्टिक्षेपात लक्षात यावा यासाठी तो पुढे सारणीच्या स्वरुपात दिला आहे–


| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती तंत्रे आणि साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ज्ञानात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | | | | | | |

वरील सारणीत पाठ्यक्रमाची दिशा लक्षात यावी म्हणून केवळ काही उदाहरणे दिली आहेत. आपल्या विद्यार्थ्यांचा आणि उपलब्ध साधनांचा विचार करून शिक्षकांनी त्यांना इतर अनेक अध्ययन अनुभव तसेच मूल्यमापन तंत्रे यांची जोड द्यायला हवी.

## ६.१ संबोध :-

अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या अंगात म्हणजेच पाठ्यक्रमात आशयाचा विचार केला जातो.आशयात येणारे संबोध फार महत्त्वाचे असतात, अभ्यासक्रमात ते आढळून येतात. परंतु त्यांना योग्य न्याय मिळण्यासाठी आणि विशेषतः विद्यार्थ्यांच्या वैचारिक विकासासाठी त्यांच्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी प्रथम आपण 'संबोधा'संबंधी चर्चा करू या.

आपण आपल्या नेहमीच्या बोलण्यात 'बोध होणे' म्हणजे 'अर्थ कळणे' असा शब्दप्रयोग करत असतो. अर्थ कशाचा तर आपल्यापुढे आलेल्या माहितीचा. काही मानसशास्त्रज्ञांनी माहितीचा अर्थ लावण्याच्या प्रक्रियेचा सखोल अभ्यास करून एक नवे शास्त्र विकसित केले. त्याला 'बोधाचे मानसशास्त्र' (Cognitive Psychology) असे म्हणतात. या शास्त्राच्या आधारे इतर शास्त्रांची मांडणी-संरचना कशी तयार झाली आहे, हे समजून घेतले जाते. कोणत्याही विकसित शास्त्राची अथवा विद्याशाखेची संरचना पुढील आकृतीत दाखविल्याप्रमाणे असते.




प्रत्येक विद्याशाखेत अक्षरशः असंख्य तपशील असतात. ते इंद्रियांना अनुभवता येतात. त्यातील ज्यांचा अर्थ समजतो त्या तपशिलांचा आपणाला अवबोध झाला असे आपण म्हणतो. अनेक अवबोधांच्या साम्यभेदांच्या आधारे समान विशेष असणाऱ्या तपशील-समूहांचा एक गट करून संबोध तयार केले जातात. पुढे या संबोधांचे परस्पर संबंध लक्षात येतात. त्यांना विधानांच्या स्वरूपात मांडले जाते. या विधानांचा परत परत पडताळा घेतला जातो. तो पटला तर ती विधाने नियम म्हणून स्वीकारली जातात. या नियमांच्या आधारे नवे तपशील समजून घेतले जातात. त्यातून मग वेगवेगळ्या उपपत्ती मांडल्या जातात. विषयाच्या सखोल ज्ञानग्रहणाला या उपपत्ती उपयोगी ठरतात.

भाषेचा विचार केला तर स्वर, व्यंजने इत्यादींचे ध्वनी हे मूलभूत तपशील म्हणता येतील. प्रत्येक तपशील एकमेकापेक्षा वेगळा असतो. उदाहरणार्थ अ, आ, ई, क, छ, ण, ज्ञ इत्यादी. लक्षपूर्वक ऐकले की त्यांचे वेगळेपण आपल्या लक्षात येते आणि त्यांना वेगवेगळे ओळखता येते. असा जो 'बोध' होतो त्याला आपण 'अवबोध' असे म्हणतो. ज्या ध्वनींमधले सारखेपण आणि इतरांपासूनचे वेगळेपण लक्षात येते, अशांचा आपण गट करतो. उदा. ध्वनींमध्ये फरक असतात. कंठातून बाहेर पडणारे आणि तोंडात कोणाताही अडथळा न येणारे 'अ' पासून 'औ' पर्यंतचे ध्वनी एकत्र करून त्यांचा 'स्वर' हा संबोध तयार होतो. 'अं', 'अः' यांचे उच्चार 'अ' मुळे शक्य होतात. त्यांच्या सुरुवातीला 'अ' हा स्वर येतो म्हणून तयार होणाऱ्या गटाला 'स्वरादी' अशी संज्ञा मिळाली आहे. 'क' पासून 'ज्ञ' पर्यंतचे ध्वनी तोंडातील विविध अवयवांच्याद्वारे उच्चारले जातात. त्यांना 'व्यंजने' ही संज्ञा मिळून त्यांचा एक संबोध तयार होतो. स्वर, स्वरादी, व्यंजने यांनी मिळून मोठा गट तयार होतो. त्याला 'वर्ण' असे नाव आहे. वर्ण हा बृहत्संबोध आहे व त्या गटाची समग्र वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्याला नाव दिले आहे. ज्या नावाने हे गट ओळखले जातात त्यांना संबोध असे म्हटले जाते. व्याकरणाप्रमाणे साहित्यातही संबोध आणि बृहत्संबोध आहेत. गद्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, विनोदी लेख, प्रवासवर्णने अथवा घटना, पात्रे, उक्ती, कृती आणि पद्यामध्ये पद, गीत, ओवी, अभंग, पोवाडा, देशभक्तीपर तसेच निसर्गवर्णनपर, आत्मपर कविता आणि व्याकरणामध्ये छंद, वृत्ते, अलंकार इत्यादी.

अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या पाठ्यपुस्तकात समाविष्ट झालेले पाठ हे विशिष्ट साहित्यप्रकाराचे नमुने असतात. त्यांचा परिचय होणे, त्यांची वैशिष्ट्ये समजणे महत्त्वाचे असते. त्यामुळे तशाच प्रकारचा दुसरा नमुना समोर आला तर जुन्या परिचित नमुन्याच्या वैशिष्ट्यांच्या आधारे मुलांना तो समजून घेता येतो. उदाहरणार्थ एखाद्या पाठ्यपुस्तकात चार–पाच निसर्गवर्णनपर कविता असतील तर त्यात वर्णन केलेली वस्तुस्थिती, तिच्या संदर्भात कवीने केलेल्या कल्पना, वापरलेल्या प्रतिमा, त्यातील शब्दसामर्थ्य इत्यादी तपशील यांचे परस्पर संदर्भ लक्षात आले तर एका साहित्य प्रकाराचा सखोल परिचय होण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते. असे होत राहिल्यामुळे विद्यार्थी संबोधांच्या पातळीपर्यंतसुद्धा पोहोचतात. (कृपया मराठी (प्रथम भाषा) परिशिष्ट अ पहावे.) त्यामुळे साहित्याचा आस्वाद घेणे आणि स्व–निर्मिती करणे या विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास होतो.

संबोधांचे विचारप्रक्रियेत फार महत्त्व आहे. प्रत्यक्ष व्यक्ती, वस्तू, प्रतिमान, चित्र यांच्या अनुपस्थितीतही विचार करणे शक्य होते ते संबोधांमुळेच. संबोधांच्या आधारे तर्क करणे, अनुमान बांधणे, कल्पना करणे, नवनिर्मिती करणे शक्य होते. ही सुविधा केवळ विकसित भाषा असलेल्या मानवालाच प्राप्त होते आणि तिच्या बळावरच मानवाने आज एवढी प्रगती केली आहे. एकविसाव्या शतकाच्या द्वितीयार्धात नागरिकांची कर्तव्ये बजावण्याची जबाबदारी असणाऱ्या उद्याच्या विद्यार्थ्याला अनेक प्रकारच्या समस्या सोडवायच्या आहेत, अनेक प्रकारच्या स्पर्धांना तोंड द्यायचे आहे. अशा वेळी उच्चतर विचार करू शकणाऱ्यांचाच निभाव लागणार आहे. त्यासाठी संबोध हे प्राथमिक साधन ठरणार आहे. संबोधांचे हे महत्त्व लक्षात घेऊन प्रस्तुत अभ्यासक्रमात आशयामध्ये भाषिक संबोधांची काही उदाहरणे दिलेली आहेत. आम्हांला खात्री आहे की त्यावरून शिक्षक विविध

पाठांत असलेले अन्य संबोध शोधून काढतील आणि प्राथमिक स्तराच्या आठ वर्षांच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये ते विकसित व्हायला मदत करतील. एका दृष्टीने शिक्षकांना आवश्यक असणारे स्वातंत्र्य या संबोध निवडीच्या रूपाने प्राप्त होणार आहे.

### ६.२ अध्ययनअनुभव –

अभ्यासक्रमाचे ध्येय आणि उद्‌दिष्टे साध्य होणे हे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अध्ययन–अनुभवांवर अवलंबून असते. आजपर्यंतच्या अध्ययन अनुभवांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष आधार होता तो वर्तनवादाचा (Behaviourism). त्यात शिकविण्याला आणि शिकविणाऱ्याला महत्त्व होते. परंतु वर म्हटल्याप्रमाणे या अभ्यासक्रमाने ज्ञानसंरचनावादाचा (Constructivism) स्वीकार केला आहे. त्यामुळे शिकण्याला आणि शिकणाऱ्याला आता महत्त्व येणार आहे. कारण या विचारसरणीप्रमाणे प्रत्येक विद्यार्थी मिळणाऱ्या अनुभवाचा अर्थ स्वतःच्या पूर्वानुभवांच्या आधारे लावत असतो. हे करताना काही वेळा अडचणी येतात. विशेषतः नवे अनुभव पूर्वीच्या अनुभवांच्या विरोधात जात असतील अथवा समजत असलेल्या नव्या अनुभवांना नेमके काय नाव द्यावे असा प्रश्न पडला असेल तर कुणा जाणकाराची मदत लागते. मग ती वर्गभगिनी असेल, दुसरा मोठा माणूस असेल अथवा शिक्षिका असेल. स्वयंशिक्षणात सुलभता (Facilitation) आणणे हे त्या सुलभकाचे (Facilitator) काम राहणार आहे. ही नवी भूमिका चांगली वाटली तरी ती पार पाडणे अवघड जाणार आहे. एखादी नवी गोष्ट शिकणे सोपे असते; पण जुने विसरणे कठीण असते. त्यामुळे शिक्षक–शिक्षिकांना सुरुवातीला स्वतःमध्ये बदल करून नवीन सवयी लावून घ्याव्या लागतील. ते कसे करायचे याचे काही मार्गदर्शन मिळावे यासाठी सुलभकांच्या कृती आणि विद्यार्थ्यांच्या कृती यांची काही उदाहरणे दोन–तीन संबोधांच्या संदर्भात दिलेली आहेत. आम्हांला खात्री आहे की शिक्षक–शिक्षिका आपापल्या विद्यार्थ्यांचे पूर्वानुभव, उपलब्ध शैक्षणिक सुविधा व साधने यांचा विचार करून वेगळ्या अध्ययन अनुभवांची या नमुन्यांना जोड देतील.

### ६.३ विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदल

वर म्हटल्यानुसार या अभ्यासक्रमाला ज्ञानसंरचना विचारसरणीचा आधार आहे. या विचारसरणीप्रमाणे शिकण्याची पहिली पायरी म्हणजे नवा अनुभव समजून घेणे आणि आपल्या बोधात्मक संरचनेमध्ये (Cognitive Structure) त्याला सामावून घेणे अथवा त्याच्या मागणीप्रमाणे आपल्या बोधात्मक रचनेत इष्ट ते बदल करणे. प्रत्येक विद्यार्थी स्वतःच्या पूर्व अनुभवांच्या संदर्भात नवे अनुभव समजून घेत असतो. प्रत्येक विद्यार्थ्याचे पूर्वानुभव दुसऱ्यापेक्षा वेगळे असण्याची जास्त शक्यता असल्याने प्रत्येकजण मिळालेल्या अनुभवाचा वेगवेगळा अर्थ लावण्याची शक्यता जास्त असते आणि त्यानुसार ज्ञान, वृत्ती अथवा कौशल्यांत बदल घडत असतो. म्हणूनच उदाहरणादाखल दिलेल्या बदलांना 'संभाव्य' असे म्हटले आहे. सगळ्या विद्यार्थ्यांमध्ये एकच एक स्वरूपाच्या बदलाची अपेक्षा न करता शिक्षकांना विद्यार्थ्यांमधील वेगवेगळ्या बदलांना समजून घ्यावे लागेल.

### ६.४ मूल्यमापनपद्धती व साधने –

यापूर्वी निरीक्षण करता येतील आणि मोजता येतील असे, आणि तेही लेखी कामगिरीत दिसणारे असे विद्यार्थ्यांमधील बदल पाहून गुण देण्याची रीत होती. परंतु आपण 'सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापना'चा (Continuous and Comprehensive Evaluation) स्वीकार केल्यामुळे आता तोंडी, तसेच गटातील कामगिरीचे निरीक्षण करून अथवा अन्य तंत्रे वापरून मुलांमध्ये पडलेला फरक नोंदविता येणार आहे, त्याचा दर्जा ठरविता येणार आहे. यासाठी 'राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदे'ने तयार केलेल्या पुस्तिकांची मदत घेता येईल. त्यात उल्लेख केलेल्या काही तंत्रांची व साधनांची उदाहरणे या रकान्यात दिलेली आहेत.

## ७. इयत्तानुसार पाठ्यक्रम :–

यापुढे पहिलीपासून आठवीपर्यंतच्या प्रत्येक इयत्तेचा पाठ्यक्रम दिलेला आहे. त्यात वर चर्चा केलेली सर्व अंगे –उद्दिष्टांपासून मूल्यमापनापर्यंतची – दिलेली आहेत.

## इयत्ता – पहिली – पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांना पुढील **उद्दिष्टे** साध्य करण्यास मदत व्हावी म्हणून चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. सूचना ऐकून व ओळखून त्याप्रमाणे कृती करणे.

२. योग्य उच्चारांसह गाणी म्हणणे.

३. चित्रांच्या साहाय्याने गोष्ट सांगणे.

४. मराठी शिष्टाचार पाळणे.

५. स्वतःबद्दल आणि कुटुंबीयांबद्दल माहिती सांगणे.

६. ध्वनी–भेद लक्षात घेऊन उच्चारण करणे.

७. सुमारे २५ दृक् शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

८. सुमारे ५०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे.

९. सुमारे १५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती विकसित करणे.

# इयत्ता १ ली – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| अभिवादन | **शिक्षक–शिक्षिका** विद्यार्थ्यांनी माध्यमभाषेतून केलेल्या अभिवादनाचा स्वीकार करणे, कौतुक करणे. त्यांना मराठीतून करावयाच्या अभिवादनाचा परिचय करून देणे व तशी कृती करून दाखविणे. | शिक्षिका वर्गात येताच त्यांना माध्यमभाषेतून अभिवादन करणे.<br><br>शिक्षिकांनी केलेल्या अभिवादनाचा उच्चार आणि कृती यांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणे. | मराठीतून अभिवादन करण्याच्या पद्धतींची व उद्‌गारांची माहिती होते. | नव्या माहितीचा आनंद होतो. | घरातील व्यक्तींना माहिती देतात. मराठीतून अभिवादन करतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | नंतर वर्गाकडून मराठी अभिवादनाचा उच्चार करवून घेणे. त्यानंतर गटांत एकमेकांना अभिवादन करण्याचा सराव करवून घेणे. | शिक्षिकांच्या मागोमाग योग्य प्रकारे उच्चार करणे. गटात एकमेकांना मराठीतून अभिवादन करणे. | | | | निरीक्षण व नोंद |
| | विद्यार्थ्यांच्या घरी अभिवादन करण्याची वेगळी पद्धत आहे का असे विचारून वेगळ्या पद्धतीचा वर्गाला परिचय करवून देणे. | अभिवादनाच्या वेगळ्या पद्धतीचे निरीक्षण करणे. | अभिवादनाच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी त्यातून आदर व्यक्त होतो हे कळते. | ज्येष्ठ व्यक्ती, समवयस्क यांच्याबद्दल आदर व्यक्त करतात. | वर्गाला भेट देणारे पाहुणे, क्षेत्रभेटीत अन्य व्यक्ती यांना मराठीतून अभिवादन करतात. | – |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| खेळ–सूचनापालन | सूचनेनुसार कृती करण्याच्या खेळाचे स्वरूप समजावून सांगणे, प्रात्यक्षिक दाखविणे. उदा. कृतींसह – उठा, बसा, हसा, रडा, पळा, थांबा इ. | शिक्षिका घेत असलेल्या प्रात्यक्षिकांचे निरीक्षण करणे. कृतींच्या आधारे खेळातील सूचना समजून घेणे. | शब्द व कृती यातील साधर्म्य लक्षात येते. | वर्गमित्रांबरोबर कृती करण्याची मजा अनुभवतात. | सूचनेप्रमाणे कृती करतात. | – |
| ध्वनी–भेद | घंटा, घुंगरू, दूरध्वनी तसेच भ्रमणध्वनीवरील संकेतध्वनिमालिका यांचे प्रत्यक्ष ध्वनिमुद्रित आवाज ऐकवून ते ओळखण्यास सांगणे. | आवाज लक्षपूर्वक ऐकणे व त्याच्याशी साहचर्य असलेल्या वस्तूंची नावे सांगणे. त्या आवाजाची नक्कल करणे. | ध्वनींचे उच्चारण योग्य तऱ्हेने कसे करायचे ते कळते. | उच्चारणाची मजा घेतात. | ध्वनी–भेद लक्षात घेऊन उच्चारण करतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| पक्षी व त्यांचे आवाज | विद्यार्थ्यांना मैदानात घेऊन जाणे. नवा खेळ समजावून सांगणे. पक्ष्यांची चित्रे ओळखून घेणे. त्यांची मराठी नावे सांगणे. पुनरावृत्ती करून घेणे. | शिक्षिका बोलत असताना परिचित शब्द ऐकण्याचा प्रयत्न करणे. पक्षी ओळखणे, त्यांची माध्यमभाषेतील नावे सांगणे. त्यांची मराठीतील नावे लक्षात ठेवणे, उच्चारणे, पुनरावृत्ती करणे. | कृती आणि संबंधित सूचना यांचे संबंध लक्षात येतात.<br><br>धारणा आणि साहचर्य यांच्या मदतीने पूर्वानुभव आठवतात. | खेळाचा आनंद घेतात. | मराठीतून सूचना देत परिसरातील मित्रांबरोबर हा खेळ खेळतात. | निरीक्षण व नोंद |
| | एकेका पक्ष्याचा कटआऊट दाखवीत त्याचा आवाज काढण्यास सांगणे. विद्यार्थी तसे करू शकले नाहीत तर स्वतः ते आवाज काढून दाखविणे अथवा | पक्षी आणि त्याचा आवाज लक्षात ठेवणे.<br><br>आवाजाची नक्कल करण्याचा प्रयत्न करणे. | माध्यमभाषा आणि मराठीतील पक्षी यांची पर्यायी नावे लक्षात राहतात. | पक्ष्यांची मराठी नावे ऐकून गंमत वाटते. | वेगवेगळे आवाज ऐकून ते कशाचे आहेत ते ओळखण्याचा खेळ खेळतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | ध्वनिमुद्रित आवाज ऐकविणे. त्यांच्याकडून पुनरावृत्ती करवून घेणे. | | | | मित्रांना परिसरातील पक्ष्यांची नावे सांगून त्यांचे आवाज काढून दाखवितात. | |
| पशू व वाहने यांचे आवाज | वरीलप्रमाणे पशू व वाहने ओळखण्याचा व त्यांचे आवाज काढण्याचा खेळ खेळण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे. | पक्ष्यांसंबंधात केलेल्या कृतींप्रमाणे याही वेळी कृती करणे. | पशूंचे, वाहनांचे आवाज साहचर्याने लक्षात राहतात. विशिष्ट आवाज काढण्यासाठी तोंडातल्या कोणत्या भागाचा उपयोग होतो ते कळते. | पशूंचे, वाहनांचे आवाज काढण्याचा आनंद लुटतात. | | निरीक्षण व नोंद |
| बडबडगाणी | हावभावासहित बडबडगाणी म्हणून दाखविणे. नंतर एकेक ओळ स्वतः म्हणून विद्यार्थ्यांकडून पाठोपाठ म्हणवून घेणे. | लक्षपूर्वक ऐकणे, निरीक्षण करणे. शिक्षिकांचे अनुकरण करणे. | बडबडगाण्याचा ठेका आणि परत परत ऐकू येणारे ध्वनी यांची गंमत लक्षात राहते. | नवे गाणे शिकल्याचा आनंद घेतात. | घरी गाणी म्हणून दाखवितात. | तोंडी चाचणी (बडबडगाणी) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| आकारभेद | विद्यार्थ्यांना गटात विभागून त्यांना पक्षी, पशू अथवा वाहन यांची बिंदूंनी तयार केलेली चित्रे जोडून रंगविण्यास सांगणे. | चित्रे जोडणे व रंगविणे | – | चित्रे जोडून रंगविण्याचा आनंद घेतात. | | |
| नामपट्ट्या | विद्यार्थी बिंदू जोडत आणि चित्रे रंगवीत असताना एकेका गटात जाऊन त्यातील एकेका विद्यार्थ्याचे नाव विचारून ते सर्वांसमोर कार्डावर लिहिणे व त्याच्याकडून पाच ते सहा वेळा म्हणवून घेणे. (सर्व गटातील | स्वतःचे नाव आणि गटातील मित्रांची नावे कशी लिहिली जातात याचे निरीक्षण करणे. आपले नाव व आपल्या मित्राचे नाव लक्षात ठेवण्यासाठी पुन्हा पुन्हा म्हणणे. | | आपण एवढी नावे वाचू शकलो, याचा अभिमान वाटतो. | वर्गासमोर आपापल्या गटातील जास्तीत जास्त मित्रांची व चित्रांची नावे वाचून दाखवितात. | तोंडी चाचणी (नामपट्ट्यांचे वाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | विद्यार्थ्यांच्या नामपट्ट्या तयार करायला एखादा आठवडा लागेल.) विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्राचे नाव विचारून ते चित्राखाली लिहिणे. गटाची चित्रे नावासहित एका वहीत चिकटवायला सांगून त्या वहीवर गटाचे नाव लिहिणे. | आपल्या गटातील रंगविलेल्या चित्रांची नावे लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करणे. रोज आपल्या, मित्राच्या व मैत्रिणीच्या तसेच त्यांनी काढलेल्या चित्राच्या नावांचे पाच ते सहा वेळा वाचन करणे. | – | – | – | – |
| | वर्गातील वस्तू आणि त्यांची नावे दाखवून पाच पाच वेळा म्हणवून घेणे. | शिक्षिकांच्या सूचनेनुसार वस्तूची नामपट्टी त्या त्या वस्तूवर चिकटविणे व वाचून दाखविणे. | शब्दआकारातील महत्त्वाचे फरक लक्षात येतात. | – | वर्गातील वस्तूंची नावे वाचतात. | तोंडी चाचणी (नामपट्ट्याचे वाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| चित्र–शब्दपट्ट्या | 'चित्रे ओळखा' खेळाबद्दल प्रात्यक्षिकासह माहिती सांगणे. गटात नामपट्ट्या असलेली चित्रे वाटणे व चित्राबरोबर त्याखालील नाव सुद्धा लक्षात ठेवण्यासंबंधी सूचना देणे. पुढे केवळ नावे दाखवून ती ओळखून घेणे. | खेळाबद्दलची माहिती लक्षपूर्वक ऐकणे, प्रात्यक्षिकाचे निरीक्षण करणे. गटात आळीपाळीने चित्रे ओळखण्याचा आणि त्यांची नावे लक्षात ठेवण्याचा खेळ खेळणे. चित्रांवरील नावे वेगळी काढली असता तीही वाचणे. | शब्दआकारातील महत्त्वाचे फरक लक्षात येतात. | – | चित्रांशिवाय दाखविलेली त्यांची नावे ओळखू शकतात. | निरीक्षण व नोंद |
| वाक्यसाचे | फलकावर हा, ही, हे.... आहे, तो, ती, ते....आहे असे वाक्यसाचे लिहिणे. | लक्षपूर्वक निरीक्षण करणे, ऐकणे. | वाक्यांच्या रचनेची तसेच शब्दांच्या रूपात पडणाऱ्या फरकाची जाणीव होते. | वाक्ये तयार करता आली याचा आनंद होतो. | घरी व मित्रांना वाक्ये म्हणून दाखवितात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | नंतर काही विद्यार्थ्यांना जवळ बोलावून अथवा दूरच्या विद्यार्थ्यांचा अथवा वर्गातील वस्तूंचा निर्देश करून ती वाक्ये म्हणणे.<br>गटात विद्यार्थ्यांना प्रथम तोंडी सराव करण्यास सांगणे.<br>नंतर वाक्यसाच्यांच्या पट्ट्या देऊन रिकाम्या जागेत त्यांच्या व वस्तूंच्या नावांच्या पट्ट्या ठेवून वाक्ये वाचण्याचा सराव करणे. | गटात प्रथम तोंडी व नंतर नामपट्ट्या आणि वाक्यसाचे यांच्या साहाय्याने वाक्य वाचनाचा सराव करणे. | | वाक्ये वाचता आली याचा अभिमान वाटतो. | वाक्यसाचे पाहून वाक्ये अचूक सांगतात. | |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| गोष्टी | चित्रे, कटआऊटस् किंवा बाहुलीनाट्य यांच्या मदतीने आणि हावभाव करून छोट्या गोष्टी गटात सांगणे. विद्यार्थ्यांनी माध्यमभाषेत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीतच देणे. | गोष्ट लक्षपूर्वक ऐकणे, जो भाग समजला नसेल त्याबद्दल माध्यमभाषेत प्रश्न विचारणे. नंतर मराठीत गोष्टी सांगण्याचा गटात सराव करणे. | गोष्टीतील आशय, वाक्यरचना यांची जाणीव होते. | गटाने गोष्टी सांगण्याच्या उपक्रमात सहभागी झाल्याचा आनंद होतो. | वर्गात, घरी तसेच मित्रांना गोष्टी सांगतात. | तोंडी चाचणी (गोष्ट सांगणे) |
| स्व–परिचय | स्वतःचा परिचय केव्हा व कसा करून द्यायचा ते स्वतःच्या उदाहरणाने स्पष्ट करणे, जसे स्वतःचे नाव, शाळेचे नाव, शिकवीत | लक्षपूर्वक ऐकणे, समजून घेणे. गटात स्वतःचा परिचय करून देणे, जसे स्वतःचे नाव, शाळेचे नाव आणि आपला वर्ग सांगणे. | स्वपरिचय करून देताना काय–काय व का सांगायचे ते समजते. परिचयात कोणते तपशील सांगायचे ते लक्षात येते. | मराठीतून स्व–परिचय करून देता आल्याचे समाधान वाटते. | घरी आलेल्या पाहुण्यांना स्वतःचा मराठीतून परिचय करून देतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | असलेल्या वर्गाचे नाव. तसेच एका विद्यार्थ्याचे प्रात्यक्षिक घेऊन गटात प्रत्येकाचा स्व–परिचय करवून घेणे. | | | | | |
| माझे कुटुंब | फोटो, कुटुंबवृक्षाची आकृती यांच्या मदतीने आपल्या स्वतःच्या कुटुंबाचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे. नावांना व फोटोंना जागा सोडलेल्या मजकुराची कार्डे विद्यार्थ्यांना वाटणे व भरून आणण्यास सांगणे. | लक्षपूर्वक निरीक्षण करणे, ऐकणे.<br><br>जाणकार व्यक्तींकडून नावे लिहून घेऊन व फोटो चिकटवून घेऊन कार्ड तयार करणे, वाचनाचा सराव करणे. | स्वतःच्या कुटुंबाचे चित्र डोळ्यांसमोर येते. | आपल्या कुटुंबाबद्दलची आपुलकीची भावना जागी होते. | वर्गात आपले कार्ड वाचून दाखवतात. | तोंडी चाचणी (कुटुंब परिचय) |

# इयत्ता – दुसरी – पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांना पुढील **उद्दिष्टे** साध्य करण्यास मदत व्हावी म्हणून चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. गाणी समूहात व एकट्याने म्हणणे.

२. चित्रमालिकेच्या साहाय्याने गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करणे.

३. वस्तू, पशू, पक्षी, चित्र इ. बद्दल माहिती सांगणे.

४. शाळेबद्दल, गावातील/शहरातील ठिकाणांबद्दल माहिती सांगणे.

५. आवडते खेळ, खेळणी, वाहने अन्य वस्तू यांच्याबद्दल मित्रांशी गप्पा मारणे.

६. विविध लोकांशी योग्य प्रकारे संवाद साधणे.

७. सुमारे ६०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती आणि २०० शब्दांची भाषण शब्द संपत्ती विकसित करणे.

८. सुमारे ५० दृक्–शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

९. सूचना वाचून सूचनेनुसार कृती करणे.

# इयत्ता २ री – पाठ्यक्रम

## अध्ययन क्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| बडबडगाणी | माहिती असलेली बडबडगाणी म्हणावयास सांगणे. विविध कॅसेट्स, सीडीज यावरील बडबडगाणी ऐकविणे. विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेणे. | माहिती असलेली बडबडगाणी म्हणणे. गाणी लक्षपूर्वक ऐकणे. शिक्षक/ शिक्षिकांच्या मागोमाग म्हणणे, गटात सराव करणे. | अगोदर शिकलेली गाणी आठवतात. | आवडीने गाणी म्हणतात. | एकट्याने, समूहात गाणी म्हणतात. | तोंडी चाचणी (बडबडगाणी) |
| सूचना | खेळाच्या स्वरूपात विविध कृती करण्यासंबंधी सूचना देणे. दिलेल्या सूचनेतील क्रियापद फलकावर लिहिणे, विद्यार्थ्यांकडून वाचून घेणे. गटात सराव करण्यास सांगणे. | सूचना लक्षपूर्वक ऐकणे, फलकावर लिहिलेला शब्द पाहणे, वारंवार वाचणे व सूचनेनुसार कृती करणे. | दिलेली सूचना आणि त्याचा निदर्शक शब्द यांच्यात साहचर्य निर्माण होते. | आनंदाने खेळ खेळतात. | परिसरातील मित्रांबरोबर हाच खेळ खेळतात. | तोंडी चाचणी (सूचना) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| अभिनयगीत | सीडीजवरील अभिनयगीते संगणकावर/दूरचित्रवाणीवर दाखविणे. कॅसेट्सवरील गीते ऐकविणे. त्यावर अभिनय, हावभाव शिकवून नवीन अभिनयगीतांचा सराव करून घेणे. | लक्षपूर्वक निरीक्षण करणे.<br><br>शिक्षक/शिक्षिकांनी केलेल्या कृतींचे निरीक्षण करून त्यानुसार गीतावर अभिनय करणे. | अभिनय आणि गाण्याचे शब्द यांच्या साहचर्यामुळे, तसेच फलकावरील लेखनामुळे शब्द, त्याचा आकार आणि अर्थ यांचे संबंध दृढ होतात. | आनंदाने अभिनयगीते गातात. | नव्याने शिकलेली गाणी घरी साभिनय म्हणतात. परिसरातील मित्रांना म्हणून दाखवितात. | निरीक्षण व नोंद |
| दृक्-शब्दपट्ट्यांचा खेळ | 'राजा म्हणतो...' खेळासंबंधी प्रात्यक्षिकासह सूचना देणे. | शिक्षक-शिक्षिकांनी दिलेल्या सूचनेनुसार गोलात राजा झालेल्याने आज्ञा देतानाच तिची शब्दपट्टी दाखविणे व इतरांनी तशी कृती करणे. | क्रियादर्शक पट्ट्या आणि त्यांचे उच्चार यांच्यात साहचर्य निर्माण होते. | खेळाचा आनंद लुटतात. | दाखविलेल्या क्रियापट्टीनुसार कृती करतात. परिसरातील मित्रांबरोबर हाच खेळ खेळतात. | वाचन चाचणी |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | | नंतर सराव झालेल्या आज्ञेच्या केवळ पट्ट्या दाखविणे आणि इतरांनी त्यानुसार कृती करणे. | | | | |
| प्राण्यांच्या व त्यांच्या हालचालीच्या नामपट्ट्या | ‘राज्य कुणावर...?’ खेळासंबंधी प्रात्यक्षिकासह सूचना देणे. | शिक्षक/शिक्षिकांनी दिलेल्या सूचनेनुसार सर्वांना गोलात बसवून ज्याच्यावर ‘राज्य’ आले असेल त्याने संगीताच्या तालावर गोलाभोवती फेऱ्या मारणे व संगीत थांबताच ज्याच्याजवळ पोहोचला असेल | क्रियादर्शक पट्ट्या आणि त्यांचे उच्चार यांच्यात साहचर्य निर्माण होते. | खेळाचा आनंद लुटतात. | दाखविलेल्या क्रियापट्टीनुसार कृती करतात. परिसरातील मित्रांबरोबर हाच खेळ खेळतात. | वाचन चाचणी |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | | त्याच्या पाठीत हलकेच चापट मारून हातातील चिठ्ठी देणे. चिठ्ठीवरील नाव वाचणे व त्या प्राण्याच्या हालचालींची नक्कल करणे. | | | | |
| | ‘शब्दबागे’ची सफर घडवून आणणे. | शब्दबागेच्या सफरीत सहभागी होऊन मित्रांना शब्दफुलांची ओळख करून देणे. | नवीन शब्दांची ओळख होते. | | ‘शब्दबागे’तील फुलांवरील नावे वाचतात. परिसरातील मित्रांबरोबर हाच खेळ खेळतात. | |
| गोष्टी, चित्रमालिका | स्वतः गोष्ट सांगणे, पुस्तकातील गोष्ट वाचून दाखविणे. कॅसेट्स, सीडीज | गोष्टी लक्षपूर्वक ऐकतात, पाहतात. चित्रमालिकेच्या साहाय्याने गोष्ट रचण्याचा प्रयत्न | गोष्टीतील घटना, पशू, पक्षी, माणसे यांची नावे स्मरणात राहतात. शिक्षक/शिक्षिकांचे | गोष्टीचा भरपूर आनंद घेतात. | गोष्टीतील पात्रांची नावे, घटना यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात. | तोंडी चाचणी (गोष्ट सांगणे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | वरील गोष्टी ऐकविणे, दाखविणे. चित्रमालिका दाखवून विद्यार्थ्यांकडून गोष्ट तयार करून घेणे. | करतात. गटात एकमेकांच्या मदतीने गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतात. स्वतःला माहिती असलेली वेगळी गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतात. | आवाजातील चढ–उतार, हावभाव, तसेच सीडीजमधील दृश्ये पाहून नवीन शब्दांचे अर्थ समजतात. | | घरी, परिसरातील मित्रांना गोष्टी ऐकवितात. | |
| गप्पा, गाणी | आदल्या दिवशी दिलेल्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांनी आपले आवडते खेळणे आणले आहे ना याची खात्री करून घेणे. गटात बसायला सांगून आपापल्या खेळण्याबद्दल मित्रांशी गप्पा मारण्यास सांगणे. | सूचनेनुसार आपापली खेळणी मित्रांना दाखवून त्यांच्याबद्दल बोलायला सुरुवात करणे. बोलता बोलता खेळासंबंधी अथवा खेळाडूसंबंधी गप्पा सुरू झाल्यास त्यातही सहभागी होणे. | आपल्याला खूप काही सांगायचे होते, पण मराठीतील पुरेसे शब्द आपल्याजवळ नाहीत ते मिळविले पाहिजेत याची जाणीव होते. | गप्पा–गोष्टींचा मनसोक्त आनंद घेतात. | शाळेतील मित्रांच्या खेळण्यांची माहिती परिसरातील मित्रांना सांगतात. | – |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | खेळण्यासंबंधी गाणी ऐकविणे, विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेणे. | शिक्षक–शिक्षिकांच्या मागोमाग गाणी म्हणणे. | गाण्यांतील नव्या शब्दांची जाणीव होते. | गाण्यातील लयीचा आनंद घेतात. | पालकसभेच्या वेळी प्राण्यांचे मुखवटे घालून काही गाणी सादर करणे. | प्रात्यक्षिक |
| | गटात खेळण्यांची बिंदूचित्रे व रंगपेट्या देणे. | खेळण्यांची बिंदूचित्रे जोडून त्यात रंग भरणे. | चित्रे रंगवीत असताना आकारातील फरकांची जाणीव होते. | रंगविलेल्या चित्राचा अभिमान वाटतो. | गटाने रंगविलेल्या चित्रांची चिकटवही तयार करतात. | कृती/उपक्रम |
| (ठिकाणांची)नावे | गावातील/शहरातील विशेष ठिकाणांची सहल काढणे. (शक्य नसल्यास त्यांचे फोटो दाखविणे) त्यांच्याबद्दल माहिती देणे. | निरीक्षण करणे. माहिती लक्षपूर्वक ऐकणे. | गावातील–शहरातील ठिकाणांची विशेष माहिती कळते. | नवी माहिती कळल्याचा आनंद होतो. | घरी आणि परिसरातील मित्रांना आपल्या अनुभवाबद्दल माहिती देतात. | – |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| (व्यावसायिकांशी) संवाद | विविध व्यावसायिकांच्या भेटी आयोजित करणे. | व्यावसायिकांना अभिवादन करून तेथे बसण्याची परवानगी घेणे. तेथे बसून त्यांच्या कामाचे निरीक्षण करणे. काही वेळाने निरीक्षणात आलेल्या शंका विचारणे. | अनोळख्या व्यक्तीशी संवाद कसा करावा ते कळते. नवी माहिती मिळते. | नवी माहिती कळल्याचा आनंद होतो. | गटात आपल्याला मिळालेली माहिती सांगतात. | तोंडी चाचणी (माहिती सांगणे) |

## इयत्ता - तिसरी - पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांना पुढील **उद्दिष्टे** साध्य करण्यास मदत व्हावी म्हणून चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे-

१. सुचविलेल्या विषयावरील गाणी म्हणणे.

२. दररोजचा वार/दिनांक सांगणे.

३. चित्र-शब्दपट्ट्या ओळखणे, चित्रांशिवाय शब्दपट्ट्या ओळखणे.

४. परिचित शब्दांच्या आद्य वा अंत्याक्षरांवरून मुळाक्षरांचा व स्वरचिन्हांचा परिचय करून घेणे.

५. उच्चारसाम्यावरून मुळाक्षरांची पारंपरिक रचना विकसित करणे.

६. या टप्प्याच्या अखेरीला सुमारे ७०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, २५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि ७० दृक-शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

# इयत्ता ३ री – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र १ – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| गाणे<br><br>वार, दिनांक | सात जणांचा गट तयार करणे. सात वारांचे गाणे– कृती खालीलप्रमाणे– विद्यार्थ्यांना वारांच्या शब्दपट्ट्या देऊन वारांची गाडी करून म्हणून घेणे. दररोजचा वार, दिनांक विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल अशा पद्धतीने उच्चारून निर्देशित करून लिहिणे. | गटांची, वारांची गाडी करून गाणे म्हणणे. गटात वारांची नावे क्रमाने सांगणे. सरावानंतर दररोज वार, दिनांक सांगणे. वार, अंक इ. ची गाणी म्हणणे. | वारांची नावे माहीत होतात. दिनांक सांगण्याची पद्धती समजते. | मराठीतील वारांची नावे समजल्याचा आनंद होतो. | गाणे चालीत म्हणतात. दररोजचा वार, दिनांक सांगतात. | तोंडी काम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| चित्रशब्दपट्ट्या | परिचित असणाऱ्या वस्तू, प्राणी, फळे, फुले इ. चित्रे व त्यांची नावे असणारी कार्डे दाखविणे. चित्रे व नावे निर्देशित करून ती ओळखण्याचा खेळ घेणे. | गटात चित्रांच्या आधारे नावे, नावांच्या आधारे चित्र ओळखण्याचा खेळ खेळणे. चित्र–शब्द, शब्द–शब्द यांच्या जोड्या लावण्याचा खेळ खेळणे. | चित्रे व नावे यांचे सहसंबंध समजतात. शब्दांचे आकार समजतात. | खेळांची मजा घेतात. | इतर नावे ओळखण्याचा प्रयत्न करतात. | कृती/उपक्रम |
| शब्दपट्ट्या (क्रियादर्शक शब्द) | 'राजा म्हणतो....(परिचित खेळ) क्रियादर्शक शब्दांचा उच्चार न करता शब्दपट्ट्या दाखवून खेळण्यास सांगणे. | पाहिलेल्या शब्दाच्या आधारे कृती करण्याचा खेळ खेळणे, उच्चारणे. शब्दपट्ट्या वाचणे. | दृक्शब्द ओळखून कृतीशी सांगड घालण्याची जाण येते. | खेळाची मजा घेतात. | इतर शब्द ओळखण्याचा प्रयत्न करतात. | कृती/उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| चित्रवर्णन | विद्यार्थ्यांना परिचित असणाऱ्या वस्तूंचे, चित्रांचे वर्णन त्यांच्याच मदतीने करणे, त्यात वापरल्या गेलेल्या शब्दांचे फलक लेखन करणे, त्याच शब्दांच्या शब्दपट्ट्या तयार करून वाचण्यास देणे. | मराठीतून चित्रवर्णन करण्याचा प्रयत्न करणे. फलकांवरील शब्द पाहणे. चित्रपट्ट्यांवरील शब्द वाचणे. | वर्णनात वापरलेल्या शब्दांचे आकार समजतात. | नवीन शब्द ओळखण्याचा आत्मविश्वास वाढतो. स्वतः सांगितलेले शब्द वाचण्याचा आनंद वाढतो. | वेगवेगळे शब्द वाचण्याचा प्रयत्न करतात. | कृती/उपक्रम |
| मजकूर | खेळातून, वर्णनातून परिचित झालेल्या 'शब्दांची बाग' तयार करणे. या शब्दांपासूनच विद्यार्थ्यांच्या मदतीने चार ते | 'शब्दबागे'तून शब्द निवडून स्वतःचा मजकूर तयार करणे. इतरांनी तयार केलेले मजकूर वाचणे. | शब्दांच्या साह्याने मजकूर लेखन कसे करायचे ते समजते. | मराठी वाचनाचा आत्मविश्वास वाढतो. | शब्द बदलून वेगवेगळे मजकूर तयार करतात. मजकूर वाचण्याचा प्रयत्न करतात. | तोंडीकाम (मजकूर वाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | पाच वाक्यांचे मजकूर तयार करणे. कार्डावर लिहिणे. मजकुरांचे प्रकटवाचन करणे. | | | | | |
| शब्दसंपत्ती | जसजशी मुळाक्षरे, स्वरचिन्हे परिचित होत जातील तसतसे त्यांच्या साहाय्याने नवनवीन शब्द तयार करण्याचा खेळ घेणे. | मुळाक्षरे व स्वरचिन्हे यांची वेगवेगळ्या पद्धतीने जुळणी करत नवनवीन शब्द तयार करण्याचा खेळ खेळणे. | शब्द तयार करण्याची रीत समजते. | स्वतः शब्द तयार करण्यात आनंद वाटतो. | शब्द तयार करतात, वाचतात. | उपक्रम |
| नाणी, नोटांची नावे | नाणी, नोटा प्रत्यक्ष हाताळण्यास देणे. त्यांची नावे सांगणे. पालकांच्या सहकार्याने प्रत्यक्ष वापर करण्याविषयी | गटात नाणी, नोटा ओळखण्याचा खेळ खेळणे. व्यवहारात पालकांच्या सहकार्याने नाणी, नोटांचा प्रत्यक्ष वापर करणे. | नाणी, नोटांची मराठी नावे समजतात. | व्यवहारात मराठी वापराविषयीचा आत्मविश्वास वाढतो. | गरजेनुसार नोटा, नाण्यांच्या मराठी नावांचा व्यवहारात वापर करतात. | उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | सूचना देणे. वस्तू, त्यांच्या किमती याविषयी गटात माहिती देण्यास सांगणे. त्या अनुषंगाने मराठी अंकांच्या नामांचा परिचय देणे. | त्या अनुभवाची माहिती गटात देणे. | | | | कृती/उपक्रम |
| संख्यांची, अंकांची नावे | वर्गात प्रति बाजार भरविणे. त्यावेळी देवाण-घेवाणीतून मराठी अंकांच्या संख्यांच्या नावांचे दृढीकरण करणे. | प्रतिबाजारात विक्रेते-ग्राहक या भूमिका पार पाडताना मराठी व मराठी अंक व संख्यांच्या नावांचा वापर करतात. | मराठी संख्यांची नावे समजतात. | आत्मविश्वास वाढतो. | व्यवहारात मराठी भाषा वापरतात. | उपक्रम |
| नात्यांची नावे | स्वतःचे नाव व नाती समजावून सांगणे. नाती व त्याखाली रिकामी जागा असणारा | गटात आपल्या कटुंबातील व नात्यातील व्यक्तींची नावे सांगणे. | नातेसंबंध व नात्यांची नावे समजतात. | व्यवहारात मराठी वापराविषयीचा आत्मविश्वास वाढतो. | उचित नात्यांच्या नावाने संबोधतात. | प्रकल्प |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | 'कुटुंबवृक्ष' पालकांच्या मदतीने तयार करण्यास सांगणे. वर्गासमोर तो सादर करण्यास सांगणे. | पालकांच्या मदतीने कार्डावर नाती व नातेवाईकांची नावे लिहून 'कुटुंबवृक्ष' तयार करणे. मित्रांना व शिक्षकांना कुटुंबवृक्षातील व्यक्तींची थोडक्यात माहिती देणे. | | | | |

## अध्ययन क्षेत्र २ – भाषिक नियमव्यवस्थेचा परिचय

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| मुळाक्षरे, स्वरचिन्हे | उच्चारण लक्षात घेऊन समान आद्याक्षर वा अंत्याक्षर असणाऱ्या किमान तीन शब्दांचा गट सुरवातीस सुलभकाने तयार करणे.<br>सुरवातीच्या वा शेवटी कोणता आवाज येतो या आधारे उदाहरणात दाखविल्याप्रमाणे मुळाक्षर व स्वरचिन्ह परिचय करून घेण्यास मदत करणे. असेच शब्दगट विद्यार्थ्यांना तयार करण्यास सांगणे.<br>उच्चारणाचा संबंध अक्षरचिन्हांशी जोडणे.<br>विद्यार्थ्यांना मुळाक्षरांना जोडलेली स्वरचिन्हे शोधण्यास सांगणे. | उच्चारणाच्या आधारे, एकाच अक्षराने सुरू वा शेवट होणारे शब्दांचे गट तयार करणे. बाईंना फळ्यावर लिहिण्याची विनंती करणे.<br>मुळाक्षरे, स्वरचिन्हे स्वतः शोधणे. | उच्चारणाचा अक्षरचिन्हांशी असलेला सहसंबंध समजतो. | मुळाक्षरे, स्वरचिन्हे स्वतः शोधल्याचा आनंद वाढतो. | वेगवेगळ्या शब्दांतील मुळाक्षरे, स्वरचिन्हे शोधतात. | तोंडी काम (मुळाक्षर, स्वरचिन्ह वाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | उदा.<br>सोमवार्, मंगळवार्, बुधवार् } र<br>उठा, बसा, जा } ा = आ<br>उर्वरित काही मुळाक्षरांना वा स्वरचिन्हांना दृक् शब्दसंपत्तीतील शब्दांतून शोधण्यात मदत करणे. उदा. कमळ = ळ | गटात एक वा दोन दृक्शब्दात आलेली उर्वरित मुळाक्षरे ओळखण्याचा खेळ खेळणे.<br>मुळाक्षरे व स्वरचिन्हे यांचा परिचय करून घेणे. | | | | |
| | विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत नसलेल्या मुळाक्षरे, स्वरचिन्हांचा प्रत्यक्ष परिचय करून देणे.<br>मुळाक्षरे, बाराखडीच्या तक्त्याचे वाचन घेणे. | मुळाक्षरे, बाराखडी तक्त्याचे अनुवाचन व वाचन करणे. | मुळाक्षरे, बाराखडीचा क्रम समजतो. | आत्मविश्वास वाढतो. | मुळाक्षरे व बाराखडीचे वाचन करतात. | तोंडी काम (मुळाक्षर व बाराखडी वाचन) |

## अध्ययन क्षेत्र – भाषिक नियमव्यवस्थेचा परिचय

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| उच्चारस्थान | क, च, ट, त, प या वर्गातील अक्षरांपासून सुरू होणारी व उच्चारस्थाने एकच असणारी मुळाक्षरे ओळखण्याचा खेळ घेणे. उच्चारस्थानावरून घसावाले, ओठवाले, दातवाले, टाळावाले असे वर्गीकरण करणे. | उच्चार स्थानांवरून मुळाक्षरांचे गट करण्याचा खेळ गटात खेळतात. | अक्षरांची उच्चारस्थाने समजतात. | उच्चारणाची मजा अनुभवतात. | मुळाक्षरांचे योग्य उच्चारण करतात. | प्रात्यक्षिक |
| अक्षरावयव | फळ्यावर एक अक्षर काढणे. उदा. ट. अक्षरावयवांच्या आधारे कोणकोणती अक्षरे तयार होतात हे विचारणे. उदा. ट, ठ, द, ड, ई | अक्षरावयवांपासून तयार होणारी विविध अक्षरे सांगणे व लिहिणे. | अक्षरावयवातील फरक ओळखतात. | अक्षरलेखनात आनंद वाटतो. | स्वतःहून अक्षरे लिहितात. | प्रात्यक्षिक |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| वाक्य | मी, आम्ही ही दर्शक सर्वनामे व आहे, आहोत ही क्रियापदे घेणे.<br>त्यांचा वापर करून गटात वाक्यसाचे तयार करून घेणे. वाचन घेणे.<br>उदा. मी तिसरीत आहे.<br>आम्ही तिसरीत आहोत. | वेगवेगळे दृक्शब्द वाक्यसाच्यात वापरून वाक्य वाचनाचा खेळ घेणे. | वाक्यरचना समजते. | मराठी वाचनाचा आत्मविश्वास वाढतो. | वेगवेगळी वाक्ये वाचण्याचा प्रयत्न करतात. | तोंडी काम (वाक्यवाचन) |

## इयत्ता - चौथी - पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांना पुढील **उद्दिष्टे** साध्य करण्यास मदत व्हावी म्हणून चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. परिचित शब्दांच्या साहाय्याने तोंडी वाक्ये तयार करणे.

२. परिचित अक्षरे व स्वरचिन्हे यांच्या साहाय्याने बनविलेले शब्द वाचणे.

३. परिचित शब्दांच्या साहाय्याने तयार केलेली वाक्यकार्डे वाचणे.

४. दृक–शब्दांच्या मदतीने तयार केलेले अनुभवतक्ते वाचणे.

५. शब्दांची नादमयता ओळखणे.

६. पाठ्यपुस्तकाच्या आणि अपरिचित वाचन साहित्याच्या वाचनाचा आनंद घेणे.

७. सुमारे ८०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, ३०० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि ८० दृक्–शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

८. परिचित अक्षरे व स्वरचिन्हे यांच्या साहाय्याने नवे शब्द बनविणे.

# इयत्ता ४ थी – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र १ – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| वर्णन | विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांबाबत गप्पा मारणे. सोपे प्रश्न विचारणे. उत्तरांच्या आधारे नवीन शब्दांचा, वाक्यांचा परिचय करून देणे. त्या आधारे चित्राचे तोंडी वर्णन करून घेणे. | चित्रांचे निरीक्षण करणे. प्रश्नांची उत्तरे देणे. वर्णन करण्यासाठी आवश्यक शब्दांची जुळवाजुळव करणे. गटात वर्णन करणे. | वर्णनाची पद्धती समजते. | सहकार्याची भावना वाढीस लागते. | स्वतःच्या शब्दांत वर्णन करण्याचा प्रयत्न करतात. | तोंडी काम (चित्रवर्णन) |
| प्रसंगचित्र वर्णन | परिचित प्रसंगावर आधारित चित्रे दाखविणे. त्यांतील तपशील विचारणे. त्याआधारे वर्णन करून घेणे. | प्रसंगचित्रांतील तपशील सांगणे. तोंडी वर्णन करणे. | वर्णनाची पद्धती समजते. | सहकार्याची भावना वाढीस लागते. | चित्राचे स्वतःच्या शब्दांत वर्णन करण्याचा प्रयत्न करतात. | तोंडी काम (प्रसंगचित्र वर्णन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| अनुभवकथन, अनुभवतक्ते | दुकान, भाजीबाजार, बसस्थानक, मनोरंजनाचे कार्यक्रम, परिसर भेट, इत्यादी ठिकाणी आलेल्या अनुभवांबाबत चर्चा करणे. प्रश्न विचारून आलेल्या अनुभवांचे कथन करून घेणे. विद्यार्थ्यांचे अनुभव तक्त्यांवर लिहिणे. | आवडलेल्या बाबींविषयी चर्चा करणे. आलेल्या अनुभवांचे कथन करणे. स्वतःच्या मित्रांच्या अनुभवांच्या तक्त्यावरील वर्णनाचे वाचन करणे. | कथनाची पद्धती समजते. | भाषा वापरण्याविषयी आत्मविश्वास वाढीस लागतो. | संदर्भाने शब्दांचे अर्थ समजतात. वाचनाची सवय वाढीस लागते. | वर्गकार्य |
| आकारभेद | सारख्या असणाऱ्या आकृत्यांत एक वेगळी आकृती काढणे. 'पाहुणा ओळखा' खेळ घेणे. | निरीक्षण करणे. आकृत्यांतील फरक ओळखण्याचा खेळ खेळणे. | आकृत्यांतील साम्यभेदाची जाण येते. | खेळ खेळण्यात मजा वाटते. | वेगळी आकृती ओळखतात. | प्रात्यक्षिक |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | क्रमाक्रमाने फरक पडणाऱ्या आकृत्यांचे संच निरीक्षणास देणे. आकृत्यांत फरक कसा पडतो हे विचारणे. | आकृत्यांतील क्रमाने पडणारा फरक सांगणे. | आकृत्यांतील क्रमाने पडणाऱ्या भेदाची जाण येते. | खेळ खेळण्यास मजा वाटते. | फरकांचा क्रम ओळखण्याची क्षमता वाढते. | प्रात्यक्षिक |
| गिरविणे | अक्षरांसाठीचे ठिपके जोडून शब्द तयार होतील अशी शब्दकार्डे तयार करणे. अक्षर योग्य दिशेने कसे गिरवायचे याचे प्रात्यक्षिक दाखविणे. कार्ड गिरविण्यास देणे. तयार झालेले शब्द वाचण्यास सांगणे. | योग्य दिशेने अक्षरे गिरवून शब्द लेखन करणे. लिहिलेल्या शब्दांचे गटात वाचन करणे. | अक्षर व शब्दलेखनाची दिशा, वळण समजते. | स्वतः गिरविण्याने आत्मविश्वास वाढतो. | वेगवेगळी अक्षरे गिरवून शब्द लेखन करतात. | प्रात्यक्षिक |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| शब्दसंपत्ती | वर्णन, अनुभवकथन इत्यादीतून मिळणाऱ्या शब्दांचे, वाक्यांचे विद्यार्थ्यांसमोर कार्डांवर लेखन करणे. वेळोवेळी ती कार्डे गटात वाचनास उपलब्ध करणे. | लेखनाचे निरीक्षण करणे. गटात शब्द, वाक्यांचे वाचन करणे. | वेगवेगळ्या शब्दांची ओळख होते. संदर्भाने शब्दांचे अर्थ समजतात. | भाषा वापरण्याविषयी आत्मविश्वास वाढीस लागतो. | शब्द, वाक्य समजून वाचतात. | प्रात्यक्षिक |
| गोष्ट | चित्रमालिका दाखविणे. त्यातील तपशील विचारणे. त्यावर आधारित गोष्ट सांगणे. गोष्टीतील पात्रे, घटना इ. विषयी प्रश्न विचारणे. गोष्ट सांगण्यास सांगणे. | गोष्टींतील पात्रे, घटना सांगणे. चित्रमालिकेच्या आधारे गोष्ट सांगणे. पुस्तके वाचून आवडलेली गोष्ट गटात सांगणे. | गोष्ट सांगण्याची पद्धत समजते. | गोष्टींची पुस्तके वाचण्याची आवड निर्माण होते. | बालसाहित्यातील गोष्टी वाचतात. | उपक्रम, स्वाध्याय |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | चित्रांसह गोष्टी असणारी पुस्तके वाचण्यास देणे. आवडलेल्या गोष्टी गटात सांगण्यास सांगणे. | | | | | |
| कविता | कवितांचे प्रकटवाचन करणे. अनुवाचन करून घेणे. कवितेच्या विषयाबद्दल चर्चा करणे. कविता तालासुरात म्हणणे. | कविता योग्य पद्धतीने वाचणे. नादमय शब्द, कल्पनारम्यता इ. च्या आधारे कवितेचा आनंद घेणे. विषय समजून घेणे. कविता तालासुरात म्हणणे. | कवितेतील कल्पना समजतात. विषय समजतात. | तालासुरात कविता म्हणण्याचा आनंद घेतात. | कविता पालकांना म्हणून दाखवतात. | तोंडीकाम (कविता गायन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| विनोद | प्रासंगिक विनोद सांगणे, विनोद वाचण्यास देणे. | शिक्षिकेप्रमाणे गटात विनोद सांगणे. विनोद वाचणे. | विनोदातील गंमत समजते. | विनोदातील मजा अनुभवतात. | विनोद वाचतात. इतरांना सांगतात. | तोंडीकाम (विनोद सांगणे) |

## अध्ययन क्षेत्र २ – भाषिक नियमव्यवस्थेचा परिचय

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| जोडाक्षर | मुख्य अक्षर एका रंगात व जोडाक्षर वेगळ्या रंगात लिहिलेले जोडाक्षरयुक्त शब्द वाचण्यास देणे. शब्दवाचनात मदत करणे. | शिक्षिकेच्या सहकार्याने जोडाक्षरयुक्त शब्द योग्य उच्चारांसह वाचणे. | अक्षरांना जोडण्याची पद्धती समजते.<br><br>जोडाक्षरांचे उच्चारण करणे समजते. | आत्मविश्वास वाढीस लागतो. | जोडाक्षरयुक्त शब्द असणारी वाक्ये वाचतात. | तोंडीकाम, वर्गकार्य (शब्दवाचन) |